
# १. हिरवळ आणिक पाणी



हिरवळ आणिक पाणी
तेथे स्फुरती मजला गाणी
निळीतुनी पाखरे पांढरी किलबिलतात थव्यांनी
सुखात चरती गुरेवासरे
लवेतुनी लहरते कापरे
हवेतुनी आरोग्य खेळते गार नि आरसपानी
उरी जिथे भूमीची माया
उन्हात घाली हिरवी छाया
सांडित कोमल आनंदाचे पाझर पानोपानी
जिथे अशी समृध्द धरित्री
घुमति घरे अन् पुत्रकलत्री
रमे श्रमश्री माहेरीच्या स्वाभाविक लावण्यी
सख्यापरते जिथे न बंधन
स्मितात शरदाचे आमंत्रण
सहजोद्गारी गाढ चांदणे, स्पर्शी स्नेह हिमानी
ऋतुऋतूंतून जिथे सोहळे
तसेच उघड्यावरी मोकळे
आणि अंगणी शृंगाराची निर्मळ अमृतवाणी
माणूस जेथे हवाहवासा
अभंग-ओवीमध्ये दिलासा
विश्वासावर जीवन सुस्थिर, श्रध्दा नम्र इमानी
देव जिथे हृदयांत सदाचा
भार मनाला नसे उद्याचा
सुखे दुजाच्या हिरवळ चित्ती, दुःखे डोळा पाणी

– बा. भ. बोरकर

## शब्दार्थ

पाणी - जल - (water)
पाखरे - खग - (birds)
पान - पर्ण - (leaf)
भूमी - जमीन/धरणी - (earth)
गाणी - गीत - (songs)
हवा - पवन/वारा - (wind air)
डोळा - नेत्र - (eye)

## स्वाध्याय

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. हवेतून काय खेळते?

........................................

........................................

२. गुरेवासरे कशी चरत आहेत?

........................................

........................................

........................................

३. जीवन सुस्थिर कशावर आहे?

........................................

........................................

........................................

४. धरती कशी आहे?

........................................



Scanned with CamScanner

..............................................................................................................................

## खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१. कवितेत कशाचे वर्णन केले आहे?

..............................................................................................................................

..............................................................................................................................

..............................................................................................................................

..............................................................................................................................

२. कवितेत झाडाचे वर्णन कोणत्या ओळींतून आणि कसे केले आहे?

..............................................................................................................................

..............................................................................................................................

..............................................................................................................................

## कवितेच्या ओळी पूर्ण करा.

१. सुखात ..............................................................................................

..............................................................................................................

.............................................................................................................. आरसपानी

२. सख्यापरते ..............................................................................................

..............................................................................................................

.............................................................................................................. हिमानी

३. ऋतुऋतूंतून ..............................................................................................

..............................................................................................................

.............................................................................................................. अमृतवाणी



Scanned with CamScanner

## जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| १. हिरवी | पाझर |
| २. भूमीची | माया |
| ३. गाठ | छाया |
| ४. निर्मळ | चांदणे |
| ५. आनंदाचे | अमृतवाणी |

## वचन बदला.

१. पाखरे - ..................  २. वासरे - ..................

३. पान - ..................  ४. चांदणी - ..................

५. डोळा - ..................

## विरुध्दार्थी शब्द लिहा.

१. बंधन X ..................  २. मृत्यू X ..................

३. सुस्थिर X ..................  ४. दुःख X ..................

५. निर्मळ X ..................

## शब्द शुध्द करून लिहा.

१. भूमिची - ..................  २. हीरवी - ..................

३. अंगनि - ..................  ४. चीत्ति - ..................



Scanned with CamScanner

## इंग्रजीत शब्द लिहा.

१. हिरवळ - ..........................................  २. भूमी - ..........................................

३. निर्मळ - ..........................................  ४. डोळा - ..........................................

## "निसर्ग माझा सोबती" या विषयावर दहा ओळींचा निबंध तुमच्या शब्दात लिहा.

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................



Scanned with CamScanner

Activity – I

## खालील चित्र पाहा व त्यावर आधारित दहा ओळींचा निबंध लिहा.






Scanned with CamScanner

# २. वहिनींची वेल

सकाळ सरत आली तशी घरातली गर्दी, गडबड कमीकमी होऊ लागली. रमेशची नि मधूची मारामारी संपली. दोघांनी भरभर जेवून घेतले व दप्तर धुंडाळून शाळेचा रस्ता पकडला. कुंदाचे गाणे गुणगुणणे व आरशात लचकणे आटोपले व तीही सायकल काढून कॉलेजला गेली. दादांनी जेवण उरकले, कपडे केले व वहिनींनी दिलेला विडा चघळत ते कचेरीला गेले. जेवायच्या पंक्तीत शिते उडवून बाळ पाळण्यात झोपी गेला. आजोबांचा विडा कुटण्याचा कार्यक्रम हळूहळू आटोपला. खलबत्त्याचा आवाज थांबला व घोरण्याचा आवाज सुरू झाला. सईने धुण्याचे पिळे घरात ठेवले व खरकटी भांडी परसात नेऊन ठेवून ती निघून गेली. पुढल्या वाडीतला पोपट पेंढा भरल्यासारखा





Scanned with CamScanner

तटस्थ राहिला अन् अखेर सर्व घरकाम आटोपलेले पाहून वहिनींनी पुढल्या दाराला कडी घातली, मागील दार लोटले व माजघरात चौघडीवर त्या आडव्या झाल्या.

मागले दार कुरकुरत बंद झाले, तेव्हा परसातील सायलीची वेल विलक्षण कष्टी झाली. एकाकीपणाच्या कल्पनेने ती पाठीकडच्या भिंतीला अधिकच बिलगली अन् उन्हाच्या जाणिवेने हसणारी पाने अधोमुख झाली.

वेळ कधी संपतो असे वेलीला झाले! डाव्या अंगाला वर झेपावणारे उनाड टोकाने उंचावून भिंतीपलीकडे पाहायचा प्रयत्न केला. रस्त्यावर आता कुठे वाळलेला कडबा खाणाऱ्या म्हशी डुलत चालल्या होत्या. अजून रस्त्यावरची माणसांची रहदारी संपली नव्हती. वाळलेले गळलेले एखाद्दुसरे पान वाऱ्यावर वाहत होते. छे, अजून कितीतरी वेळ लोटायचा आहे! दूरवर दिसणाऱ्या मनोऱ्यावरील तबकडीतील काट्याकडे ते कोवळे कोंब कुतूहलाने कितीतरी वेळ पाहत राहिले.

मग बाजूची फांदी दाराच्या फटीतून आत निरखू लागली. आत बराच काळोख होता. उजेडाच्या पट्ट्यात मुंग्यांची रांग साखरेचे कण घेऊन धावत होती. कोपऱ्यात कुठेतरी धान्याच्या डब्यात उंदीर खुडखुडत होता.

वेलीला भारी वाईट वाटले अन् खूप रागही आला. चोरी! आपल्याला दोन-दोन, चार-चार, आठ-आठ पाय आहेत, वाटेल तिकडे वाटेल तेव्हा हिंडायला मुभा आहे, म्हणून चोरी करायची? अन् धान्य नि साखर संपली तर उद्या वहिनी काय करणार? मुले काय खाणार? रागाच्या भरात फांदी घसरली व अधांतरी लोंबू लागली. गुलाबासारखे काटे किंवा पानवेलीसारख्या नख्या नाहीत म्हणून तिला हळहळ वाटत होती अन् चुलीशी तीक्ष्ण नख्यांचे उंदीर खाणारे मांजर खुशाल पहुडले होते, म्हणून तिला अधिकच संताप येत होता.

अखेर वेलीने रागाने आपली किरकोळ यष्टी हलवली. वाळकी पाने टपाटपा पडली. आवाज झाला, सावल्या हलल्या; पण मुंग्यांची रांग मोडेना व उंदराचे उंडारणे संपेना. खरकट्या भांड्यांवरचे उष्टे खाणारा बिचारा कावळा मात्र उडून गेला.

तेवढ्यात सूर्य भर आकाशात आला. त्याच्या किरणांच्या नजरा सहन न होऊन वेलीने आपली सारी पर्णछिद्रे मिटून घेतली.

(आता वेलीला आपल्या स्वतःच्याच संसाराकडे लक्ष देणे भाग होते.) तिच्या अंगातला घाम पर्णछिद्रांवाटे बाहेर पडून वाफेसारखा नाहीसा होत होता. पर्णछिद्रे पुरी बंद केल्यावर तिचे अवयव



Scanned with CamScanner

कोरडे झाले नि आता बरे वाटले. सारी दालने बंद केल्यावर ती स्वतःच्या स्वयंपाक घरात डोकावू लागली. लगेच कोठारात हरितद्रव्याचे हिरवे हारेच्या हारे मंडईतून आणलेल्या भाजीसारखे पडले. शेगड्या-शेगड्यांवरून साठवलेल्या साखरेचा पाक ढवळून निघाला. रोजची रसोई सुरू झाली. पिठूळ पक्वान्नाची ताटे भरू लागली. पायापासून पाण्याच्या कावडी आणणे सुरू झाले. बाजूबाजूंनी प्राणवायूची फोडणी दिली गेली. सारे रांधणे करता करता वाहिनींसारखी तिला त्या ऐतखाऊ मांजराचा, चोरट्या मुंग्यांचा नि उष्टे खाणाऱ्या कावळ्याचासुध्दा हेवा वाटला. वहिनींसारखा विसावा घ्यावासा वाटला. सारेजण विसावले होते, आडोशाला गेले होते. ही मात्र उन्हात एकटी उभी होती. तेवढ्यात तिला दूरवर उभ्या असलेल्या सूर्यफुलांचे स्मरण झाले. तिने सळसळून खुणावले; पण बिचारे सूर्यफूल पाहू शकत नव्हते. काय व्रत वाट्याला आले होते बेट्याच्या! एकटे उन्हात उभे राहायचे, डोईवर घागर घेतल्यासारखे अन् सूर्याची स्वारी हालेल तसे तोंड वेंगाडून पाहत राहायचे. सूर्याला कधीही दया येत नव्हती. अनेक बारक्या फुलांचे, किड्यांनी भरलेले नुसते एक रंगीत तबक. नावही त्याचेच सूर्यफूल! त्यापेक्षा आपले किती छान नाव - वहिनींची वेल!

वहिनींची वेल आनंदली, डुलली. आपल्या भाग्यावर लोभावली. आपल्याला निदान या भिंतीचा आधार आहे अन् वहिनींचा आसरा आहे. या भिंतीवर आपण पसरतो, बागडतो. वाऱ्यावादळाला, ऊनपावसाला भीत नाही अन् त्यांची मुले आपली किती काळजी घेतात, जपतात. घरात गाय, कुत्रा, पोपट असावा तसेच. त्याहून अधिक लाडक्या आपण! सुखावलेली वेल भिंतीवर सुस्तावली. आसासून वहिनींच्या संसाराकडे पाहू लागली.

## शब्दार्थ

रस्ता - मार्ग - (road)
पोपट - राघू - (parrot)
दार - दरवाजा - (door)
वेल - लता - (creeper)
फूल - सुमन - (flower)
राग - क्रोध - (anger)
पान - पर्ण - (leaf)
सूर्य - रवी - (sun)
आकाश - नभ - (sky)



Scanned with CamScanner

# स्वाध्याय

## रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१. ................................................ कमीकमी होऊ लागली.

२. मग बाजूची ................................................ दाराच्या फटीतून आत निरखू लागली.

३. खरकट्या भांड्यांवरचे ................................................ खाणारा बिचारा कावळा मात्र उडून गेला.

४. पण बिचारे ................................................ पाहू शकत नव्हते.

## खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा.

१. वहिनींनी झोपण्याआधी कशाची खात्री करून घेतली?

................................................

................................................

................................................

२. वेलीने आपली पर्णछिद्रे का बंद करून घेतली?

................................................

................................................

................................................

३. वेलीला कोणाचा हेवा वाटला?

................................................

................................................

................................................



Scanned with CamScanner

४. दाराच्या फटीतून वेलीने काय पाहिले?

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

५. वेल कशावर सुस्तावली?

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

## खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१. वेलीने पर्णछिद्रे बंद केल्यावर तिच्यात कोणकोणते बदल झाले?

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

२. आपण सुखात आहोत, असे वेलीला का वाटले?

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

३. सायलीच्या वेलीला कोणाकोणाचा हेवा वाटला? का?

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................



Scanned with CamScanner

## जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| १. ऐतखाऊ | मुंग्या |
| २. चोरट्या | वेल |
| ३. उष्टे खाणारा | मुंगी |
| ४. वहिनींची | कावळा |
| ५. साखरेचे कण खाणारी | मांजर |

## अर्थपूर्ण वाक्य बनवा.

१. डब्यात उंदीर कोपऱ्यात कुठेतरी धान्याच्या खुडखुडत होता.

........................................................................................................

२. पाने पडली टपाटप वाळकी.

........................................................................................................

३. कावडी पायापासून आणणे पाण्याच्या झाले सुरू.

........................................................................................................

४. घ्यावासा विसावा वाटला वहिनींसारखा.

........................................................................................................

## चूक की बरोबर ते लिहा.

१. परसातील सायलीची वेल विलक्षण कष्टी झाली. ..............................

२. खरकट्या भांड्यांवरचे उष्टे चिमणी खाऊ लागली. ..............................



Scanned with CamScanner

३. सूर्यफूल सावलीत उभे होते. ..........................................

४. वेलीला भिंतीचा आधार होता. ..........................................

## लिंग बदला.

१. कावळा - .......................... २. मांजर - ..........................

३. मुंगी - .......................... ४. गाय - ..........................

५. कुत्रा - .......................... ६. पोपट - ..........................

## वचन बदला.

१. कपडा - .......................... २. वेल - ..........................

३. मुंगी - .......................... ४. कावळा - ..........................

५. सूर्यफूल - ..........................

## ''माझे आवडते झाड'' या विषयावर पाच ओळी लिहा.

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................



Scanned with CamScanner

# ३. वेड लागलेले घर

"अयाई ग!" लगेच नंतर मोठ्याने भोकाड पसरल्याचा आवाज झाला.

मी धावतच गेले. पाहते तो धाकटीला गुडघ्याला लागले होते आणि ती कळवळून रडत होती. "काय गं? कुठे लागलं? काय झालं?"

"अगं, अशी धावता धावता खुर्चीवर आपटले!"

"कार्टे, डोळे उघडे ठेवून चालायला काय झालं होतं? चल वर, औषध लावते. गुडघ्याला औषध लावण्यापेक्षा डोळ्यातच औषध घातलं पाहिजे तुमच्या. रोज दहादा धडपडता - काय दारं अरुंद आहेत, का घरात अंधार आहे, म्हणून अशी चालता, देव जाणे!" माझ्या तोंडाचा पट्टा रोजच्यापेक्षा जोरात चालला होता. मी चांगलीच कावले होते. गेल्या दोन तासांत तिघांनी धडपडून लागून घेतले होते. औषध लावून गौरीचा गुडघा बांधला आणि तिला बजावले की, "आता अशी आंधळेपणानं



चाललीस, तर बघ चांगली सडकून काढीन; औषध वगैरे काही नाही!''

त्या दिवशी कुणाला आणखी लागले नाही. दुसऱ्या दिवशी धाकटीचा परकर शिवत बसले होते तो अंगणातून 'बघ गं काय जम्मत आहे ती!' अशी आरोळी आली व त्यापाठोपाठ गौरी धावत धापा टाकीत आली. नेहमीप्रमाणे पुढे न पाहता धडक मारून येत होती. खोलीत येता येता टेबलाच्या अणकुचीदार कोपऱ्यावर आता डोळा आपटणार असे मला दिसले व मी हातातले काम टाकून 'अगं, अगं-' म्हणत उठले तो काय चमत्कार! टेबल गहूभर मागे सरकले व गौरी डोळ्याला न लागता माझ्यासमोर येऊन थडकली. छे! टेबल कसे सरकेल? मला काहीतरीच भास झाला. थोडक्यात पोरगी बचावली खरी. पण टेबल सरकल्यासारखे दिसल्यामुळे मी इतकी बावचळले होते की, मला ती काय सांगत होती ते समजलेच नाही व तिला बोलायचेही मी विसरले.

संध्याकाळची वेळ. खोलीच्या मध्यभागी उभा राहून नंदोबा काहीतरी शाळेतली हकीकत अगदी रंगात येऊन सांगत होता. नेहमीच्या संवयीप्रमाणे स्वारी गोष्ट सांगून होत आल्यावर मागे-मागे जात दारातून बाहेर पडणार होती. दाराची एक फळी अर्धवटच उघडी होती व नेहमीप्रमाणे नंदूचे डोके धाडकन त्यावर आपटणार होते. 'नंद्या, नंद्या-' म्हणून मी ओरडते आहे, तो आपले दार हळूच उघडून भिंतीसरसे झाले व नंदोबा सुखरूप दाराबाहेर पोचले! दार कोणी उघडले म्हणावे तर दाराशी तर कोणीच नव्हते! मग काय दार आपणहूनच बाजूला झाले, का मला भ्रम झाला? बाकीच्यांकडे पाहिले तर काही विशेष झाल्याचे कोणाच्याच चेहऱ्यावर दिसत नव्हते. झाला प्रकार इतका विलक्षण की, मी कोणाजवळ बोललेच नाही- झाली गोष्ट मनात ठेवावी व काय होते ते पाहावे असे ठरवले. पुढचे दोन दिवस मी स्वप्नात तर नाही ना! असे वाटू लागले. ''धडपडली नाहीत ते? आश्चर्य आहे, नाही?'' वर्तमानपत्रात खुपसलेले डोके काढून तो म्हणतो, ''त्यात काय आहे एवढं? तू परवा खूप रागावलीस म्हणून जपून चालत असतील.'' आता मात्र कमाल आहे या गृहस्थाची! माझ्या रागावण्याने पोरे धडपडायची थांबली आणि हा वर्तमानपत्रात डोके घोलून बसायचा थांबला असता तर काय हवे होते? त्याला विचारण्यात अर्थ नाही म्हणून मी विचार करू लागले की, घराला व घरातल्या वस्तूंना झाले आहे तरी काय? घरी कोणी नाहीसे पाहून एकदा सगळ्यांना सांगितलेसुध्दा की, 'बाबांनो, तुम्ही मुलांना जपता ते ठीक आहे; पण तुमच्या अशा करण्यानं पोरं दिवसेंदिवस जास्तच बेफिकीर राहू लागली आहेत. तुमच्या या लाडानं त्यांना पुढे पस्तावा करण्याची पाळी येईल.' पण काही उपयोग झाला नाही. इतके दिवस बाकीच्या घरांसारखे वागल्यावर इतक्या दिवसांनी एकदम या घराला वेड का लागले? मला आता आठवले.

(गौरीच्या गुडघ्याला लागले त्या दिवशी भावजी आले होते) आम्ही चहा घेत असता ताईबाई




Scanned with CamScanner

गाणे गुणगुणत येता-येता आपटल्या वाटेतल्या स्टुलावर. मी नेहमीप्रमाणे कडाडले. भाऊजींनी उठून ताईला हात धरून उगी केले व दोन गोड गोष्टी बोलून खेळायला पाठवले. आणि नंतर मला एक व्याख्यान ऐकवले, "मुलं म्हणजे कशी फुलांसारखी असतात. असं त्यांना रागावलं म्हणजे त्यांचा व्यक्तिविकास थांबतो व त्यांची मनं खुरटी होतात. तू एवढी शिकलेली पण तुला मॉंटेसोरीची तत्त्वं काहीच कशी उमजत नाहीत? त्यांना काही लागायच्या आतच आपण त्यांच्यापुढची अडचण काढावी."

मी म्हटले, "बाबा रे, घरातल्या सगळ्या वस्तू काढूनसुध्दा भागणार नाही."

"छे! असं बोलू नकोस. अशा बोलण्यानं ती जास्तच धडपडतात व त्यांच्यात न्यूनगंड उत्पन्न होतो."

मी भाऊजींशी वाद घातला नाही. ते गेल्यावर थोड्याच वेळाने गौरीला लागले व मी चोप देण्याची धमकी घातली. भाऊजींचे व्याख्यान सबंध घराने तर नाही ना मनावर घेतले? मी एक निःश्वास टाकून कामाला लागले.



मुलांची बेपर्वाई नू आंधळेपणा वाढत होता व सर्व घर त्यांच्या मार्गातून बाजूला सरून त्यांचा मनोविकास करीत होते. गौरी नू मी बागेत उभ्या होतो. इतक्यात समोरून आरोळी आली, "गौरी गं धाव, हा बघ मासा कसा करतोय ते!" गौरी फाटक उघडून रस्ता ओलांडायला धावली. नेहमी ती इकडे तिकडे पाहून जायची; पण आज मात्र तिने एकदम रस्त्यात उडी घातली. रस्त्यातून केवढी मोठी लष्करी मोटार भरधाव येत होती. तिचा कर्कश भोंगा वाजला, ब्रेक दाबून चाके खर्रकन रस्त्यावर वाजली व मी धावत जाऊन जवळजवळ गाडीपुढूनच पोरीला ओढून काढले. तिला घट्ट हृदयाशी धरले; ती खूपच भेदरली होती, ओठ पांढरेफट्टक पडले होते व हृदय पाखरासारखे पिटपिट करीत होते. तिला शांत केली, समोरच्या चंदूकडे पोचवली व मी धावतच

घराच्या गच्चीवर गेले. मी पण घाबरले होते, घाबरण्यापेक्षाही मला राग आला होता. मी हुंदके देत पण रागानेच घराला व आतील सर्व वस्तूंना सांगितले, ''पाहिलं, तुमच्या लाडाचा काय परिणाम झाला तो? सांगितलं नव्हतं मी की, मुलं जास्तच बेफिकीर व निष्काळजी होतील म्हणून? आज तुमच्यामुळे माझी पोरगी हातची जात होती. कसला आला आहे मनोविकास? माझ्या रागावण्यानं ती खुरटतात काय? मूर्ख नाही तर! त्यांची डोकी आपटली तरच त्यांना शहाणपण येईल, एरवी नाही. आणि जर तुम्ही याउपर ऐकणार नसाल तर साऱ्या मुलांना बोर्डिंगात पाठवीन. मग तुम्हाला मुलांचं हसणं, रडणं, भांडणं, बोकाळणं, काही ऐकू यायचं नाही, समजलात?''

''आई ग!'' म्हणून एवढ्यात किंचाळणे ऐकू आले. मी खाली धावले तो नंदोबा रडत होता. डोके दारावर आपटून चांगलेच सुजले होते. थोडक्यात बचावला, नाहीतर डोळाच जायचा. ''चल स्वयंपाकघरात, हळदीचा ओढा घालते.'' मी त्याचा हात धरून त्याला नेले.

- इरावती कर्वे

## शब्दार्थ

डोळे - नेत्र - (eyes)
दार - दरवाजा - (door)
अणकुचीदार - टोकदार - (pointed)
खुरटे - ठेंगणे - (short, dwarf)
बोकाळणे - दंगामस्ती - (spree)
औषध - भेषज - (medicine)
कडाडणे - रागावणे - (annoy)
भिंतीसरसे - भिंतीजवळ - (near the wall)
न्यूनगंड - कमीपणाची भावना - (diffidence)
मारिया मॉंटेसरी - यांनी बालशिक्षणाची आधुनिक पध्दत तयार केली.

## स्वाध्याय

ST. MARY'S ENGLISH SCHOOL LIBRARY No. JALNA

**रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. मी चांगलेच ........................................ होते.



Scanned with CamScanner

२. मला काहीतरीच ........................................ झाला.

३. शाळेतली हकीकत अगदी ........................................ येऊन सांगत होता.

४. मी नेहमीप्रमाणे ........................................ .

५. ........................................ न् मी बागेत उभ्या होतो.

**चूक की बरोबर ते लिहा.**

१. धाकटी मुलगी खुर्चीवर आपटली होती. ....................

२. संदीप शाळेतली गोष्ट रंगात येऊन सांगत होता. ....................

३. रमाच्या गुडघ्यावर लागले होते. ....................

४. नंदोबाचे डोके दारावर आपटले होते. ....................

**कोण - कोणास म्हणाले ते लिहा.**

१. "अगं, अशी धावता धावता खुर्चीवर आपटले!"

........................................

........................................

२. "दार कोणी उघडले म्हणावे तर दाराशी तर कोणीच नव्हते!"

........................................

........................................

३. "आता मात्र कमाल आहे या गृहस्थाची!"

........................................

........................................

LIBRARY



Scanned with CamScanner

४. "बाबा रे, घरातल्या सगळ्या वस्तू काढूनसुध्दा भागणार नाही."

## खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. आईने गौरीला काय बजावले?

२. आईला कोणता भ्रम झाला?

३. मुलांचा काय वाढत होता?

४. नंदोबा का रडत होता?

५. सर्व घर त्यांचा कोणता मनोविकास करत होते?



Scanned with CamScanner

## खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१. आईच्या तोंडाचा पट्टा का सुरू झाला?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

२. भावजीने आईला कोणते व्याख्यान दिले?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

३. घरातल्या वस्तूंना रागाने आईने काय सांगितले?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

## विरुध्दार्थी शब्द लिहा.

१. मोठा X ..............................  २. अंधार X ..............................

३. अरुंद X ..............................  ४. खूप X ..............................

५. निःश्वास X ..............................

## वचन बदला.

१. खुर्ची - ..............................  २. औषध - ..............................

३. टेबल - ..............................  ४. दार - ..............................

५. गाणं - ..............................

## विरामचिन्हे योजा.

१. काय गं कुठे लागलं काय झालं

..............................................................................................

..............................................................................................

२. बघ गं काय जम्मत आहे ती

..............................................................................................

..............................................................................................

३. छे टेबल कसे सरकेल.

..............................................................................................

..............................................................................................

## रिकाम्या जागी उभयान्वयी अव्यये योजा.

१. तू परवा खूप रागवलीस .............................. जपून चालत असतील.

२. आई घरात शिरली .............................. खुर्ची बाजूला झाली.

३. कुणी जिंकेल .............................. कुणी हरेल.

४. मी शाळेत पोचलो .............................. शाळेची घंटा वाजली.



Scanned with CamScanner

## विचारधन



### समाधान कशात असते?

माणसाच्या गरजा दोन प्रकारच्या असतात. एक आर्थिक व दुसरी सामाजिक. पैसा, सुख, सत्ता, प्रतिष्ठा वगैरे गोष्टी पहिल्या प्रकारात येतात. दुसऱ्या प्रकारात सचोटी, ज्ञान, न्याय, खेळीमेळीने वागणे, सहानुभूती, दुसऱ्याचे नीट समजून घेणे, निःपक्षपातीपणा, सेवा इत्यादी गोष्टी येतात. काही उत्कृष्ट वस्तू पैशाने विकत घेता येतात; पण मनाचे व हृदयाचे समाधान, सुख व शांती, सद्‌भाव व सदिच्छा या गोष्टी बाजारात मिळत नाहीत. धनाच्या राशी ओतल्या, तरी त्या लाभत नाहीत आणि याच गोष्टी सर्वांना हव्या असतात.

आपण आधी माणूस आहोत, म्हणूनच सौंदर्याचे प्रेम, मनाचा विकास वगैरे गोष्टी आपल्याला आकर्षित करत असतात; म्हणून आपण समाधान व मनाचे स्वातंत्र्य यालाच महत्त्व दिले पाहिजे.

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन** (माजी राष्ट्रपती)



Scanned with CamScanner